# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail – dy.registrar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Qaulity Assurance (AAQA)
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

गोपनिय

क्र.एएक्युए/आयसीडी/२०२४–२५/१७२४      १८ जानेवारी, २०२५ /२८ पौष/शके, १९४६

## परिपत्रक:—

विषय:— महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळावरील **Advisor Portal** द्वारे पात्र व्सक्तींकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेबाबत...

संदर्भ:— आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ रोजीचे पत्रानुसार दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील मा.कुलगुरू व संचालनालयातील सर्व संचालक यांच्यासमवेत घेण्यात आलेली **Video Conference.**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित, महाविद्यालयांचे प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठातील विविध विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र आणि संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, श्री प्रदिपकुमार डांगे, सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, सीबीडी बेलापूर यांचे क्र.२२६५/तसू लोसेआ/१९/२०२२/१६८ (गोप—२), दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शासन सेवेत सुयोग्य व पात्र उमेद्‌वारांची निवड करण्यासंदर्भात विविध स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा व चाळणी परीक्षा घेण्यात येतात. सदर सर्व परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता प्रश्नांचा दर्जा सुयोग्य व उच्चतम काठिण्यपातळी नुसार असणे अपेक्षित आहे. यातस्तव आयोगास त्या त्या विषयातील तज्ञ अध्यापकीय संवर्गातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य इत्यादींची **Paper Setters/ Reviewers/Assessors/Moderators** या कामाकरीता आवश्यकता आहे. (प्रत संलग्न)

आयोगाकडे उपलब्ध असलेली विषयनिहाय तज्ज्ञसूची अद्ययावत करण्याच्या दृष्टीने आयोगाकडून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील मा. कुलगुरू व संचालनालयांमधील संचालक व सह संचालक यांच्यासमवेत दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी **Video Conference** आयोजित करण्यात आली होती. या **Video Conference** मध्ये आयोगाच्या वतीने मा. सदस्य डॉ. देवानद शिंदे, डॉ. अभय वाघ व डॉ. सतीश देशपांडे यांनी आयोगाची भूमिका मांडली. सदर **Video Conference** द्वारे आयोगाकडून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील मा. कुलगुरू व संचालनालयांमधील संचालक/सहसंचालक यांना आयोगाच्या गोपनीय कामांकरीता संबंधीत विषयातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सेवा उपलब्ध करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांच्या आस्थापनेवरील विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तींना आयोगाच्या संकेतस्थळावरील **Advisor Portal** द्वारे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आपल्या स्तरावरून सुचना देऊन त्यांना प्रवृत्त करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

कृ.मा.पा.

# University of Mumbai

Phone - 022 - 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Qaulity Assurance (AAQA)
UNIVERSITY of MUMBAI.
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32




त्यास अनुसरून संबंधित विद्यापीठातील मा. कुलगुरू व संचालनालयातील संचालक/सहसंचालक यांनी आयोगाच्या विनंतीस सकारात्मक प्रतिसाद दर्शवून आयोगास संबंधीत विषयांतील तज्ज्ञांची उपलब्धता करून देण्याबाबत आश्वासित केले आहे.

यापूर्वी आयोगाकडून तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज हे ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत होते. आयोगाकडील प्रचलित तज्ज्ञ सूची अद्ययावत करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याच्या दृष्टिने आयोगामार्फत तज्ज्ञ परिक्षकांचे अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत पात्र प्राध्यापकांना केवळ ऑनलाईन पदध्दतीने अर्ज सादर करावयाचा आहे. सदर अर्ज सादर करावयाच्या प्रक्रिये संबंधिची सूचना सोबत जोडलेल्या प्रसिध्द पत्रामध्ये समाविष्ठ केलेली आहे. (प्रत संलग्न)

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

मुंबई : ४०० ०३२
१० जानेवारी, २०२५

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित, महाविद्यालयांचे प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठातील विविध विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र आणि संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र

प्रत माहितीकरीता रवानाः—

१) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक
२) मा. प्र—कुलगुरूंचे स्वीय सहायक
३) मा. कुलसचिवाचे स्वीय सहायक

IS/Exam/2024-25/24133


महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

**Email ID :** so-confidential2@mpsc.gov.in **Desk-16 Tel No. 69385987 / 986 / 985**


**गोपनीय**

**क्रमांक-** २२६५/तसूलोसेआ/१९/२०२२/१६(गोप-२) **दिनांक** २७डिसेंबर, २०२४.

**प्रति,**

मा. कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ,
एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०००३२.

PVC DR-AAQA

VC 02 JAN 2025

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळावरील Advisor Portal व्दारे पात्र व्यक्तिंकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याबाबत.

**संदर्भ :-** आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ रोजीचे पत्रानुसार आयोगाकडून दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील मा.कुलगुरू व संचालनालयातील सर्व संचालक यांच्यासमवेत घेण्यात आलेली Video Conference.

Supt. for n.a 06/01/25

**महोदय,**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शासन सेवेत सुयोग्य व पात्र उमेदवारांची निवड करण्यासंदर्भात विविध स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा व चाळणी परीक्षा घेण्यात येतात. सदर सर्व परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता प्रश्नांचा दर्जा सुयोग्य व उच्चतम काठिण्यपातळी नुसार असणे अपेक्षित आहे. यास्तव आयोगास त्या त्या विषयातील तज्ज्ञ अध्यापकीय संवर्गातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य इत्यादींची Paper setters/Reviewers/Assessors/Moderators या कामाकरीता आवश्यकता असते.

२. आयोगाकडे उपलब्ध असलेली विषयनिहाय तज्ज्ञसूची अद्ययावत करण्याच्या दृष्टीने आयोगाकडून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील मा. कुलगुरू व संचालनालयांमधील संचालक व सह संचालक यांच्यासमवेत दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी Video Conference आयोजित करण्यात आली होती. या Video Conference मध्ये आयोगाच्या वतीने मा. सदस्य डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अभय वाघ व डॉ. सतीश देशपांडे यांनी आयोगाची भूमिका मांडली. सदर Video Conference व्दारे आयोगाकडून महाराष्ट्रांतील सर्व विद्यापीठांमधील मा. कुलगुरू व संचालनालयांमधील संचालक/सहसंचालक यांना आयोगाच्या गोपनीय कामाकरीता संबंधीत विषयातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सेवा उपलब्ध करण्याबाबत विनंती करण्यात आली. तसेच आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांच्या आस्थापनेवरील विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तींना आयोगाच्या संकेतस्थळावरील Advisor Portal व्दारे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आपल्या स्तरावरून सुचना देऊन त्यांना प्रवृत्त करण्याबाबत विनंती करण्यात आली.

त्यास अनुसरून संबंधीत विद्यापीठातील मा.कुलगुरू व संचालनालयातील संचालक/सहसंचालक यांनी आयोगाच्या विनंतीस सकारात्मक प्रतिसाद दर्शवून आयोगास संबंधीत विषयांतील तज्ज्ञांची उपलब्धता करून देण्याबाबत आश्वासित केले आहे.

३...

३. यापुर्वी आयोगाकडून तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज हे ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत होते. आयोगाकडील प्रचलित तज्ज्ञ सूची अद्ययावत करण्याच्या कार्यपध्दीतीमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याच्या दृष्टिने आयोगामार्फत तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Advisor Poartal या नावाने सदरचे Portal उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर Portal चा वापर करून तज्ज्ञ व्यक्तींनी आयोगाकडे अर्ज सादर करावयाचा आहे. सदर प्रणालीव्दारे अर्ज सादर करण्याची टप्पेनिहाय सविस्तर प्रक्रिया https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Candidate Inforamtion>Announcement and Circular>Press Note for Inviting online applications from persons willing to work as Experts येथे दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रसिध्दीपत्रकामध्ये देण्यात आलेली आहे. (सुलभ संदर्भाकरीता सदर प्रसिध्दीपत्रकाची तिन्ही भाषेतील प्रत सोबत जोडली आहे.)

४. परिच्छेद क्र. २ नुसार सदर प्रसिध्दीपत्रक आपल्या विद्यापीठातील व आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांच्या आस्थपनेवरील विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य(Expertise) प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तिंच्या निदर्शनास आणावे व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आपल्या स्तरावरून त्यांना सूचना देऊन प्रवृत्त करण्यात यावे, अशी आपणास विनंती आहे.

आपला

(प्रदीपकुमार डांगे)
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**सहपत्रे :-**

१) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ रोजीचे पत्राचे प्रत.

२) दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रकाची प्रत.